शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या दि.१० नोव्हेंबर, २०१७ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०२ डिसेंबर, २०१७.

वाचा:-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धिपत्रक क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब,दि.२ डिसेंबर,२०१५
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ / १६-ब,दि.१७ मे,२०१७
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ / १६-ब,दि. ९ नोव्हेंबर,२०१७

शासन शुद्धिपत्रक :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्रमांक १४९/२०१४ यामध्ये श्री.कैलास किसन गाढवे व इतर यांनी दाखल केलेल्या दिवाणी अर्ज क्र.१०३/२०१७ वर मा.उच्च न्यायालयाने दि.१०.११.२०१७ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिले आहेत :-

In our order dated 8th November,2017,the words "three months" be corrected as "six months", and the order be corrected accordingly.

२. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि.१०.११.२०१७ च्या आदेशास अनुसरून संदर्भ क्र.३ येथिल शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ खालिलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.७.४.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार देण्यात आलेल्या व दि. ४.५.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि.३.११.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यात आलेल्या तदर्थ स्वरूपातील नेमणुका, मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि.१०.११.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि.३.११.२०१७ पासून पुढील सहा महिने म्हणजेच दि.३ मे, २०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन शुद्धिपत्रक राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/ आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन शुद्धिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१२०२१५२४१९१९०७ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2017.12.02 15:28:09 +05'30'

(टि.वा.करपते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.